**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1543/2007.**

श्री डॉ. देवराम विठोबा नंदनवार
रा. 'तथास्तु' प्लॉट नं. 37, भांडे प्लॉट,
उमरेड रोड नागपूर ता. जि. नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,
अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.2.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी संचालक तथा अध्यक्ष अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास विभाग नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आपले कार्यालयातून कु. किरण दिनेश निमजे हया अर्जदाराला हलबा जातीचे वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले आहे त्याचा संपूर्ण तपशिल खालील प्रमाणे उपलब्ध करुन द्यावा.

1. कु. किरण दिनेश निमजे हिच्या जातीचे वैधता प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रमाणीत प्रत
2. जे जात प्रमाणपत्र वैध ठरविले त्या जात प्रमाणपत्राची प्रत
3. जात वैधता प्रमाणपत्रासाठी जे आवश्यक पुरावे, कागदपत्रे सादर केली त्या सर्वांच्या साक्षांकित प्रती आपले कार्यालयातून कु. किरण दिनेश निमजे हीला हलबा जातीचे वैधता प्रमाणपत्र निर्गमीत केले त्याचा तपशिल

1. उमेदवा कु. किरण दिनेश निमजे
2. तपासणी समितीचा निर्णय No./DD/TCSC/NGP/MHN/I-112/96-97
3. प्रमाणपत्र जारी केल्याचा दिनांक 15.05.97

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.3.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती मागण्याचे प्रयोजन काय तसेच कलम 8 (1) (ञ) नुसार शासकीय माहिती अधिका–याची खात्री पटल्या खेरीज आपल्यास माहिती देणे बंधनकारक नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त तथा उपध्यक्ष अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना कळवून जन माहिती

अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केला असून अधिनियमाच्या कलम 11 (1) नुसार संबंधितास विचारणा करण्यात येईल व त्यांचेकडून संमती प्राप्त न झाल्यास आपला अर्ज निकाली काढण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयानेसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे निवेदन सादर केले आहे.

सोबत खालीलप्रमाणे लेखी निवेदन सादर करीत आहे.

1) मी दि. 26.2.2007 रोजी मा. शासकीय माहिती अधिकारी संचालक तथा अध्यक्ष अनुसूचित जमाती–जात प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास विभाग नागपूर यांचेकडे माहिती मिळविण्यासाठी रितसर अर्ज दाखल केला आहे. माहिती अर्जात कु. किरण दिनेश निमजे हिला अनुसुचीत जमातीचे जात प्रमाणपत्र तपासणी समितीने जातीचे वैधता प्रमाणपत्र निर्गमीत केले त्याचा संपूर्ण तपशिल मागितला आहे. जाती तपासणी समिती ही अर्धन्यायिक स्वरुपाची असून महाराष्ट्र शासनाचा कायदा क्र. 23/2001 नुसार अनुसुचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने जातीचे वैधता प्रमाणपत्राच्या नोंदी व संपूर्ण तपशिल कार्यालयात जतन करणे आवश्यक आहे. माहिती अधिका–याने व प्रथम अपीलीय अधिका–याने सदर प्रकरणाची नस्ती सरमिसळ झाली व शोधायला उशिर लागेल असे कळवून आजपर्यंत माहिती पुरविली नाही.

2) सदर प्रकरणात माहिती अधिका–याने माहीती मागण्याचे प्रयोजन काय याबाबत मला विचारणा केली आहे. आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे की माहितीचा अधिकार 2005 अन्वये अर्जदाराला माहिती मागण्याचे प्रयोजन काय किंवा कारण कळविणे आवश्यक नाही व तशी तरतुद नाही.

3) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील 8 (1) ड नुसार अर्जदाराने मागीतलेली माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने गैर नाही. अनुसुचीत जमाती जात

प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्य अर्धन्यायीक स्वरुपाची असल्यामुळे समितीने जारी केलेले निर्णय हे सार्वजनिक उपयोगासाठी असणे आवश्यक सुन सार्वजनिक आहेत.

4) माहिती अधिका–याच्या उत्तरावर मी प्रथम अपील दि. 15.4.07 ला दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय अधिका–याने दि. 18.6.07 ला त्यांचे पत्र क्रच संआअ/अजप्रतस नाग/का–1/3802/07 उत्तर दिले आहे. प्रथम अपीलीय अधिका–याने एक महिन्यात अपिल अर्ज निकाली काढायला पाहिजे, परंतु 30 दिवस काहीच निर्णय दिला नाही. करिता मी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दि. 21.5.2007 रोजी दाखल केले.

5) माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी, अनुसुचीत जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर हे जाणून बुजुन वरील माहिती देण्यास टाळाटाळ करीत असुन सदर प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध न करणे किंवा माहिती न देणे हा शासकीय माहितीचा अधिकार व अनु.जाती.जमाती कायदा क्र. 23/2001 चा भंग आहे.

आपणास विनंती करण्यात येते की माहीती अर्जातील मुद्दे व सदर प्रकरणाची शासकीय नस्ती उपलब्ध करुन दयावी तसेच माहीतीचा अधिकार 2005 च्या कलम 20 उपलकल (1) व (2) नुसार शा. माहीती अधिका–याला शास्ती लावावी.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

डॉ देवराम विठोबा नंदनवार यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. 9.1.2005, 15.8.2005, 3.3.2006, 14.6.2006, 30.10.2006, 9.2.2007, 26.2.2007, 13.3.2007 व 21. 5.2007 अन्वये माहिती अधिकाराअंतर्गत 9 अर्ज सादर केले. तसेच त्यांची पत्नी सौ. यशश्री देवराम नंदनवार (पुर्वाश्रीमीच्या कु. हेडावू) यांनी सुध्दा दि. 15.6.2005, 20.1. 2006, 5.3.2006, 16.3.2006, 22.6.2006 व 28.10.2006 असे एकूण सहा अर्ज सादर केलेत.

उक्त अर्जासंदर्भात शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द डॉ देवराम विठोबा नंदनवार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. 22.2.2006, 8.9.2006, 15.12.2006 व 21.1.2007 असे एकूण चार अर्ज सादर केलेत.

सौ. यशश्री देवराम नंदनवार यांनी सुध्दा शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. 14.7.2006 अपील दाखल केले.

डॉ देवराम विठोबा नंदनवार व सौ. यशश्री देवराम नंदनवार यांनी मिळुन शासकीय माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी या दोघांचे नाव मिळून एकूण 20 अर्ज सादर केलेले आहेत.

अपीलकर्त्याने संबंधीताचा पत्रव्यवहाराचा पत्ता न दिल्यामुळे कलम 11 (1) अन्वये संबंधीताची संमती घेणे इत्यादी कार्यवाही करता आलेली नाही. तसेच अपीलकर्त्याची सदर माहिती ही स्वहितार्थ त्याच्या पत्नीची रीट याचिका हायकोर्टात प्रलंबीत असलेल्या प्रकरणाच्या संदर्भाने मागणी केली असून ही बाब अपिलकर्त्याने पूर्वी माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जामध्ये नमूद केलेली आहे. यास्तव माहितीच्या अधिनियमाच्या कलम 8 (त्र) नुसार मागीतलेली माहिती ही सार्वजनिक कामकाजाची किंवा हितसंबंधाची नाही, त्यामुळे कलम 8 (त्र) तसेच 7 (9) नुसार खारीज करण्यास विनंती करण्यात येत आहे.

तेव्हा वारंवार हेतुपुरस्सर अर्ज पाठवून शासकीय माहिती अधिकारी व अपीलकर्त्यास माहिती दिली नाही म्हणून वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. 3343/1990 कु. नंदा शंखपाळे व रिट याचिका क्र. 1279/2003 मधील दि. 29.7.2003 चे कोर्ट निर्देशानुसार समितीला मासिक 600 प्रकरणे निकाली काढण्याचा लक्षांक दिलेला आहे.

शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी वर्ग 2 यांचे पद दि. 6.12. 2006 पासून ते 15.4.2007 पर्यंत रिक्त असून सदर कालावधीत अतिरिक्त कार्यभार संशोधन सहा. वर्ग 3 यांचेकडे देण्यात आलेली आहे. अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचे पद दि. 12.10.2006 पासून अद्यापर्यंत रिक्त असून अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ संशोधन अधिकारी यांचेकडे अद्यापर्यंत आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे सुध्दा विहीत कालावधीची प्रकरणे निकाली काढावी लागतात.

तेव्हा मा. उच्च न्यायालयाने नेमून दिलेले लक्षांक पूर्ण करीत असता डॉ देवराम विठोबा नंदनवार व त्यांची पत्नी सौ. यशश्री देवराम नंदनवार हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरफायदा घेत आहेत. निव्वळ अधिकार मिळालेला आहे म्हणून मोघम व कोणत्याही सार्वजनिक हिताशी नाही अशा प्रकारची माहिती वारंवार अर्ज करुन मागविणे ही बाब निश्चितच योग्य नाही.

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी जो खुलासा सादर केला आहे त्यावरुन असे दिसून येते की मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. जात प्रमाणपत्र तपासणीसाठी ज्या वेळेस सादर केले जाते त्या वेळेस इतरही पुराव्यासाठी कागदपत्र सादर केले जातात व सदरची कागदपत्रे ही वैयक्तीक माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 8 (1) (ञ) च्या संदर्भामध्ये उपलब्ध करुन घेता येणार नाही असा आधार घेतलेला आहे. व ती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास कलम 11 (1) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना विचारणा करणे आवश्यक आहे असे सांगितले व त्याकरीता त्यांना कु. किरण दिनेश निमजे हयांना विचारणा करण्याकरीता पत्ता माहिती असणे आवश्यक आहे व तो अपीलकर्ता यांनी दिलेला नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी कु. निमजे यांचे प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये प्रमाणपत्र क्रमांक दिलेला आहे तसेच तपासणी समितीचा निर्णय दिलेला आहे व त्यावरुन जन माहिती अधिकारी यांना नस्ती शोधून

माहिती उपलब्ध करुन देण्यास किंवा त्रयस्थ पक्षास विचारण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नव्हती. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरचे प्रकरण 1996–97 चे आहे व त्याबाबतची नस्ती शोधणे नस्ती क्रमांक असल्याशिवाय शक्य नाही. व नस्ती मिळाल्याशिवाय पत्ता मिळणे शक्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी पत्ता दिल्यास कु. निमजे यांना अधिनियमाच्या कलम 11 (1) प्रमाणे विचारणा करुन माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल प्रयत्न करता येईल. मात्र अपीलकर्ता यांना कु. निमजे यांनी पुराव्याकरीता कागदपत्राच्या प्रती मात्र उपलब्ध करुन देता येणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना कु. किरण दिनेश निमजे यांचा निवासाचा पत्ता दिल्यानंतर 10 दिवसाचे आंत कलम 11 (1) प्रमाणे प्रक्रिया पूर्ण करुन अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे पुढील 20 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 15.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.